**उपवनसंरक्षक कोल्हापूर वन विभाग कोल्हापूर यांचे कार्यालय**

वनवर्धन, मुख्य पोष्टासमोर , रमनमळा, ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६००३ दूरध्वनी कार्यालय ०२३१-२६५११९५१
आदेश

(VDC)

क्र ब/आस्था/अनुशेष/वर/०३.०४/ ७५४०
कोल्हापूर ३ दि २४ / २/२००४

**विषय- वनरक्षकांच्या नेमणुकीबाबत**

**संदर्भ- १.वनसंरक्षक कोल्हापूर वन वृत्त कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र कक्ष ४/३/ अनुसरती/वर/४९६६ दि ६/१/२००४**

संदर्भिय पत्र क्र १ नुसार अनुशेषाचे विशेष भरती मोहिमेअंतर्गत दि.२९ व ३० डिसेंबर २००३ रोजी वनसंरक्षक, कोल्हापूर वृत्त कोल्हापूर यांचे कार्यालयात उमेदवारांच्या मुलाखती घेउन वनरक्षक पदासाठी .सक्षम प्राधिकरण ( प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नंदुरबार / सेवायोजन कार्यालय, कोल्हापूर /जिल्हा पुर्नवसन अधिकारी, कोल्हापूर ) यांचेकडून प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या यादीतील खालील उमेदवाराची प्राथमिक निवड करणेत आली होती. त्यांना या विभागातील अनुशेषाअंतर्गत रिक्त असणा-या वनरक्षक पदी वेतनश्रेणी रूपये २७५०-७०-३८००-७५-४४४० या मध्ये तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करणेत देणत येत आहे.

| अ क्र | उमेदवाराचे नाव | वनरक्षकपदी पद स्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | श्री कुशाल झिंगा पावरा मु.चिप्पल पो.राडेकलम ता अक्राणी जि.नंदुरबार | वनरक्षक , उमगाव, वनपरिक्षेत्र, चंदगड |

वरील पदस्थापनेचे आदेश खालील शर्तींच्या अधिन राहून पारित करणेत येत आहेत.

१.सदरची नेमणूक ही तात्पुरत्या स्वरूपाची असून आपणास कोणतेही कारण अथवा नोटिस न देता नोकरीवरून कमी करणेत येईल. व त्या बददल तुमची कोणत्याही प्रकारची लेखी / तोंडी विनंती विचारात घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
२.आपले पुर्व चारित्र, वर्तणुक या बाबत पोलीस विभागाकडुन स्वतंत्ररित्या चौकशी करणेत येईल. त्यांचेकडील अहवाल आक्षेपार्ह असल्यास आपली शासन सेवेतील नेमणूक समाप्त केली जाईल.
३.आपणास शासन सेवेतून राजीनामा देणेचा असल्यास एक महिना पुर्व नोटिस दयावी लागेल. अन्यथा एक महिन्याचे वेतन आपणाकडून वसुल करणेत येईल.
४.सदरची नेमणूक आदेशा प्राप्त होताच दिलेल्या आदेशा प्रमाणे नेमणुकीच्या ठिकाणी तीस दिवसात हजर राहून अहवाल सादर करावा.वेळेवर हजर न झालेस आपणास नेमणुकीची आवश्यकता नाही असे गृहीत धरणेत येईल.
५.महाराष्ट्र नागरी सेवा नियमा अंतर्गत असणा-या सर्व सेवा शर्ती व त्यात होणारे बदल आपणास लागू राहतील.
६.सदरची निवड ही संबंधित वनरक्षकाने यांचे होणारे प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण करणेचे अटीवर करणेत येत आहे.

उपवनसंरक्षक,
कोल्हापूर वन विभाग कोल्हापूर

प्रति,
श्री कुशाल झिंगा पावरा
मु.चिप्पल पो.राडेकलम ता अक्राणी जि.नंदुरबार

प्रतिलिपी-
१.वनसंरक्षक, कोल्हापूर वन वृत्त, कोल्हापूर संदर्भिय पत्र क्र १ नुसार माहितीसाठी सविनय सादर
२.परिक्षेत्र वन अधिकारी, चंदगड यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी
संबंधित उमेदवार नेमणुकीच्या ठिकाणी हजर होताच हजर दिनांक या कार्यालयास त्वरीत कळवावा.
प्रत- वेतन/ शिबीर /सेवा पुस्तक

estt/folder/word/file training/25/2/04/

25 transpear-2

# उपवनसंरक्षक, कोल्हापूर वन विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालय

८VEE

क्र. कक्ष-१/आस्था/ १०७-०८
कोल्हापूर - ३ दि.२६/११/२००७

**आदेश**

**विषय :- वनरक्षक संवर्गातुन वनपाल संवर्गात पदोन्नती देण्या बाबत.**

संदर्भ :- वनसंरक्षक, कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र.
१) कक्ष-४-३/आस्था/वर/पदो/ ४१४६ दि.७/११/२००७

संदर्भिय आदेश क्रमांक १ नुसार खालील वनरक्षकांना रु.४०००-१००-६००० या वेतनश्रेणीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेत येत आहे. पदोन्नतीच्या अनुषंगाने वनसंरक्षण व वनसंवर्धन यासाठी प्रशासकीय तत्वावर आणि लोकहितास्तव त्यांची पदस्थापना त्यांचे नावासमोर दर्शविलेले ठिकाणी करणेत आलेली आहे.

| अ.क्र | वनरक्षकांचे नांव सर्वश्री | सदयाचे कार्यरत ठिकाण | बदली नंतरचे वनपाल पदी पदस्थापनचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | पावरा कुशाल झिंगा | वनरक्षक,उमगाव परिक्षेत्र चंदगड | सहा.लागवड अधिकारी तरळे सा.व.वि.सिंधदुर्ग | श्री.मा.भा.शिंदे यांचे बदलीचे आदेशात करणेत आलेल्या बदलामुळे |

जर संबंधित वनरक्षक यांने पदोन्नतीच्या पदावर रुजु होण्यास नाकारले तर त्यांना भविष्यात मंजुर करण्यात येणा-या आश्वासित योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

वरील प्रमाणे पदोन्नत करण्यात आलेल्या वनरक्षकांचे जेष्ठ वनरक्षकांने अनुसुचित जमाती या प्रवर्गाचा जातीचा वैध दाखला सादर केलेस सदरचे पदावर आता पदोन्नत केलेले वनरक्षक सेवाजेष्ठतानुसार पदोन्नतीस पात्र राहणार नाहीत व पर्यायाने त्यांना पदावनत करणेत येईल यांची संबंधितास जाणीव करुन दयावी.

वनरक्षकांना त्यांच्या पदोन्नतीच्या ठिकाणी रुजु होणेसाठी स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे.संबंधितांना कार्यमुक्त केल्याच्या तारखा वेळीच या कार्यालयास सादर कराव्यात.

उपवनसंरक्षक,
कोल्हापूर वन विभाग, कोल्हापूर

प्रति,
वनक्षेत्रपाल, ,चंदगड,
प्रतिलिपी :- वनसंरक्षक, कोल्हापूर वनवत्त, कोल्हापूर यांना संदर्भिय पत्राचे अनुषगाने माहितीसाठी सादर .
प्रतिलिपी :- उपसंचालक,सामाजिक वनीकरण सिंधुदुर्ग यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
प्रतिलिपी :- कोषगार अधिकारी सिंधुदुर्ग यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

S.